
सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १८ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

## मंत्र्यांनी घेतलेला निर्णय बदलण्याचा कायदेशीर अधिकार केवळ मुख्यमंत्र्यांनाच

### राज्य सरकारकडून महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम अधिसूचि जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**

राज्य सरकारने महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम २०२६' अधिसूचित केले आहेत. या नव्या नियमांनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने कोणत्याही मंत्र्याने घेतलेल्या निर्णयात हस्तक्षेप करून तो निर्णय बदलण्याचा कायदेशीर अधिकार मिळाला आहे. मात्र, असा निर्णय बदलताना त्यामागील कारणे मुख्यमंत्र्यांना लेखी स्वरूपात नोंदवावी लागणार आहेत. नव्या नियमांमुळे मुख्यमंत्री, मंत्री, मुख्य सचिव आणि विविध विभागांच्या सचिवांच्या प्रशासकीय अधिकारांबाबत अधिक स्पष्टता




आली आहे. संबंधित विभागाच्या कामकाजाची प्राथमिक जबाबदारी त्या विभागाच्या मंत्र्याचीच राहणार असली तरी सार्वजनिक हिताच्या बाबतीत मुख्यमंत्र्यांना त्या विभागातील मंत्र्याच्या निर्णयात हस्तक्षेप करता येणार आहे.

तसेच मुख्यमंत्री एखाद्या विभागाशी संबंधित कागदपत्रे मागवू शकतात. मुख्यमंत्री कार्यालयाकडून कागदपत्रांची मागणी झाल्यास संबंधित मंत्री आणि विभागाच्या सचिवांना ती कागदपत्रे सादर करणे बंधनकारक असेल. नव्या कार्यपद्धती नियमांमध्ये सरकारच्या प्रशासकीय कामकाजाची पद्धत, मंत्र्यांच्या जबाबदाऱ्या तसेच मुख्यमंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अधिकार याबाबत तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे भविष्यात सार्वजनिक हिताशी संबंधित महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता आहे.

या नव्या नियमांमुळे राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेत निर्णयप्रक्रियेबाबत अधिक स्पष्टता येणार असून, मुख्यमंत्री आणि संबंधित विभागाचे मंत्री यांच्यातील अधिकार व जबाबदाऱ्यांची चौकटही स्पष्ट होणार आहे.

## राममंदिर देणगी चोरी अहवालात चंपत राय - मिश्रांचे नाव:इतर ८ आरोपी अगोदरच तुरुंगात

### SIT चा फायनल रिपोर्ट सरकारला सादर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अयोध्या** - राम मंदिरात देणगी चोरीच्या चौकशीसाठी यूपी सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीने आपला अंतिम अहवाल सादर केला आहे. सूत्रांनुसार, या अहवालात ट्रस्टचे माजी सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य डॉ. अनिल मिश्रा यांचे नाव नाही.

गृह विभागाने पुढील कार्यवाहीसाठी हा अहवाल राम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्यगोपाल दास यांच्याकडे सोपवला आहे. हा अहवाल ट्रस्टच्या २ सप्टेंबर रोजी होणाऱ्या बैठकीत मांडला जाईल.देणगी चोरीचे प्रकरण समोर आल्यानंतर राम मंदिर ट्रस्टने राज्य सरकारकडे एसआयटी चौकशीची विनंती केली होती. त्यानुसार १३ जून रोजी सरकारने एसआयटीची स्थापना केली होती.




लखनऊचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या या ३ सदस्यीय एसआयटीत आयजी रेंज किरण एस आणि विशेष सचिव (वित्त) नील रतन कुमार यांना सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते. एसआयटीने २३ जून रोजी आपला प्राथमिक अहवाल सरकारला सादर केला होता.

मात्र, देणगी चोरीची चौकशी अजूनही सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थापन केलेली दुसरी एसआयटी या प्रकरणाची चौकशी करत आहे. सर्वोच्च न्यायालयाने एसआयटीमध्ये चौकशीची सूत्रे आयपीएस अधिकाऱ्याकडे सोपवण्यास सांगितले होते. त्याचबरोबर, यात आर्थिक तज्ज्ञांनाही समाविष्ट करण्याचे निर्देश दिले होते.त्यानंतर २० जुलै रोजी नवीन एसआयटी (डखढ) स्थापन करण्यात आली होती. यात आयजी (खत्रः) लखनऊ रेंज किरण एस, डीआयजी (ऊखत्रः) अयोध्या सोमेन वर्मा आणि अयोध्या एसएसपी (डड्झ) गौरव ग्रोवर यांचा समावेश होता.

## लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाला फडणवीस सरकार देणार मोठं गिफ्ट

### थेट आदेशच काढला




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**- राज्यात धर्मांतरासंदर्भातील नव्या कायद्याच्या अंमलबजवणीचा मार्ग मोकळा झाला आहे. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ येत्या २८ ऑगस्ट २०२६ पासून राज्यभर लागू होणार आहे. याबाबत राज्याच्या गृह विभागाकडून अधिकृत पत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. गृह विभागाने १७ ऑगस्ट रोजी ही अधिसूचना जारी केली. Notification No. N-X-0724/C.R.240/Spl-1इनुसार महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ मधील तरतुदी लागू करण्यासाठी २८ ऑगस्ट ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. याच दिवशी रक्षाबंधन असल्याने सरकारकडून लाडक्या बहिणींना मोठे गिफ्ट देण्यात आले. राज्यपालांच्या आदेशानुसार व त्यांच्या नावाने गृह विभागाचे उपसचिव प्रितमकुमार जावळे यांनी ही अधिसूचना प्रसिद्ध केली आहे.या कायद्याला राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांची मंजुरी मिळाल्यानंतर तो अधिकृत राजपत्रात प्रकाशित करण्यात आला. आता निश्चित करण्यात आलेल्या तारखेपासून हा कायदा महाराष्ट्रात लागू होईल.

बळजबरी, फसवणूक, आमिष, खोटी माहिती किंवा लग्नाचे आश्वासन देऊन करण्यात येणारे धर्मांतर रोखणे हा या कायद्याचा प्रमुख उद्देश आहे. बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये या कायद्यानुसार कारवाई करता येणार आहे.

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम, २०२६ यंदाच्या मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधिमंडळाने मंजूर केला होता. त्यानंतर विधेयक राज्यपालांकडे आणि पुढे राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आले. राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर कायद्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांसाठी सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे २८ ऑगस्टपासून राज्यातील बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांवर कारवाई करण्यासाठी नव्या कायद्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे. त्यामुळे आता जबरदस्तीने धर्मांतरण करणाऱ्या प्रवृत्तीला कायद्याचा दणका बसणार आहे.

## २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबण्याची शक्यता

### डिसेंबर २०२६ किंवा जानेवारी २०२७ मध्ये मतदान होण्याचा अंदाज




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई** - राज्यातील जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे बिगुल आता चालू वर्षाऐवजी थेट पुढच्या वर्षी वाजण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशामुळे अडचण सर्वोच्च न्यायालयाने 'एसआयआर' (डखठ) प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे राज्य निवडणूक आयोगासमोर मोठी तांत्रिक अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे 'एसआयआर' प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच प्रत्यक्ष निवडणुकांचा मार्ग मोकळा होणार आहे. प्रशासकीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या सर्व प्रक्रियेनंतर ऑक्टोबर महिन्यात अंतिम मतदार याद्या जाहीर होण्याची शक्यता आहे. मतदार याद्या प्रसिद्ध झाल्यानंतरच पुढील निवडणूक कार्यक्रमाची अधिकृत घोषणा केली जाईल. त्यामुळे प्रत्यक्ष मतदान डिसेंबर २०२६ किंवा जानेवारी २०२७ मध्येच पार पडेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

#### २० जिल्हा परिषदा अन् २११ पंचायत समित्या प्रभावित

निवडणुका लांबणीवर पडल्यामुळे राज्यातील मुदत संपलेल्या २० जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या २११ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका आता २०२६ च्या अखेरीस किंवा २०२७ च्या सुरुवातीला होतील. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची अंतिम तारीख नक्की काय असेल, हे सर्वोच्च न्यायालयात होणाऱ्या आगामी सुनावणी आणि न्यायालयाच्या अंतिम निकालावरच पूर्णपणे अवलंबून असणार आहे.

## नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सचिन अंदुरेला जामीन, जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ मुंबई**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी (१८ ऑगस्ट) महत्त्वाचा निर्णय दिला. २०१३ मधील या हत्येप्रकरणी पुणे सत्र न्यायालयाने दोषी ठरवलेल्या सचिन अंदुरे याला उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला असून, त्याला सुनावण्यात आलेल्या जन्मठेपेच्या शिक्षेलाही स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला.

या निर्णयामुळे तब्बल १३ वर्षांपासून सुरू असलेल्या दाभोलकर हत्या प्रकरणाला पुन्हा एकदा वेगळे वळण मिळाले आहे. यापूर्वी याच प्रकरणातील दुसरा दोषी शरद कळसकर यालाही मुंबई उच्च न्यायालयाने एप्रिल २०२६मध्ये जामीन दिला होता. त्यामुळे दाभोलकर हत्या प्रकरणात सत्र न्यायालयाने दोषी ठरवलेले दोन्ही आरोपी सध्या जामिनावर बाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.डॉ. नरेंद्र दाभोलकर हे अंधश्रद्धा, अघोरी प्रथा आणि समाजातील बुवाबाजीविरोधात सातत्याने जनजागृती करणारे सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून अंधश्रद्धेविरोधात मोठी चळवळ उभी केली होती. २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी पुण्यातील ओंकारेश्वर परिसरातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर मॉर्निंग वॉक करत



असताना दुचाकीवरून आलेल्या दोन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या हल्ल्यात दाभोलकरांचा मृत्यू झाला. या हत्येने महाराष्ट्रासह देशभरात खळबळ उडाली होती.दाभोलकर हत्या प्रकरणातील दुसरा दोषी शरद कळसकर याला मुंबई उच्च न्यायालयाने एप्रिल २०२६ मध्ये जामीन दिला होता. त्यावेळी न्यायालयाने कळसकर हाच हल्लेखोर असल्याच्या ओळखीबाबत प्रथमदर्शनी काही शंका उपस्थित केल्या होत्या. त्याची जन्मठेपेची शिक्षाही स्थगित करण्यात आली होती. आता त्याच धर्तीवर सचिन अंदुरेलाही जामीन मंजूर करण्यात आला असून त्याची जन्मठेप स्थगित करण्यात आली आहे. त्यामुळे २०२४ मध्ये दोषी ठरलेल्या दोन्ही आरोपींना उच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.मात्र, जामीन आणि शिक्षेला स्थगिती मिळणे म्हणजे आरोपींची निर्दोष मुक्तता झालेली नाही. सत्र न्यायालयाने दिलेली दोषसिद्धी अंतिम ठरलेली नसून तिच्याविरोधातील अपील उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. उच्च न्यायालयाच्या आजच्या आदेशामुळे अंदुरेला अपीलचा अंतिम निकाल लागेपर्यंत जामिनावर राहता येणार आहे.

#### सर्वोच्च न्यायालयात अपील करू- हमीद दाभोलकर

या निर्णयानंतर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे चिरंजीव डॉ. हमीद दाभोलकर यांनी न्यायालयाच्या निर्णयाचा सविस्तर अभ्यास करून पुढील कायदेशीर पाऊल उचलणार असल्याचे स्पष्ट केले आहे. शरद कळसकरला उच्च न्यायालयाने जामीन दिल्यानंतरही दाभोलकर कुटुंबीयांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता सचिन अंदुरेच्या जामिनाच्या निर्णयाविरोधातही सर्वोच्च न्यायालयात अपील करण्याची भूमिका कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे.

## कापसाच्या दरात तेजी; चांगल्या प्रतीचा कापूस नऊ हजार रुपये क्विंटल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**

उत्तर व मध्य भारतातील पाच राज्यांमध्ये ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून नवीन कापूस बाजारात यायला सुरुवात झाली आहे. चांगल्या प्रतीच्या व किमान १२ टक्के ओलावा असलेल्या कापसाला प्रतिक्विंटल ८,५०० ते ९,७०० रुपये दर मिळत आहे. ओलावा अधिक असलेल्या कापसाचे दर यापेक्षा कमी आहेत. विशेष म्हणजे, ही खरेदी व्यापाऱ्यांची आहे. दर चांगले मिळत असले तरी या बाजारपेठांमध्ये कापसाची आवक अतिशय संथ असून, रोज दोन हजार ते पाच हजार क्विंटल कापूस विक्रीला येत आहे.



केंद्र सरकारने मध्यम धाग्याच्या कापसाची एमएसपी ८,२६७ रुपये तर लांब धाग्याच्या कापसाची ८,६६७ रुपये प्रतिक्विंटल जाहीर केली आहे. पंजाब, हरयाणा, राजस्थान, गुजरात व मध्य प्रदेश या राज्यांमधील नवीन कापूस दरवर्षी ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यापासून यायला सुरुवात होते.गुजरातमधील अमरेली, राजकोट, जसदण बाजारपेठेत सामान्य प्रतीच्या कापसाला प्रतिक्विंटल ८,३०० ते ९,२०० रुपये तर उच्च प्रतीच्या कापसाला ९,८०० रुपयांपर्यंत दर मिळत आहे.

हरयाणातील सिरसा, एलनाबाद मार्केटमध्ये सामान्य प्रतीचा कापूस ७,९०० ते ८,५०० रुपये आणि उच्च प्रतीचा कापूस ८,७०० रुपये, पंजाबमधील अबोहर, भटिंडा बाजारात सामान्य प्रतीचा कापूस ७,३०० ते ८,००० रुपये व उच्च प्रतीचा कापूस ८,४०० रुपये, राजस्थानातील श्रीगंगानगर, हनुमानगढ बाजारात सामान्य प्रतीचा कापूस ७,४०० ते ८,१०० रुपये व उच्च प्रतीचा कापूस ८,५०० रुपये तसेच मध्य प्रदेशातील निमाड, माळवा भागात सामान्य प्रतीच्या कापसाला ७,३०० ते ८,४०० रुपये आणि उच्च प्रतीचा कापूस किमान ९ हजार रुपये प्रतिक्विंटल दराने व्यापारी खरेदी करीत आहेत.

## संपादकीय ......

# उत्सवांतून उत्साह हवा, उन्माद नको

*श्रावण महिन्यातील नागपंचमीपासून विविध सण आणि उत्सव सुरू होतात. माणसांच्या जीवनात सण आणि उत्सवांमुळे उत्साह निर्माण होत असतो. नेहमीच्या कामाच्या रगाड्यामुळे तोचतोपणा येतो, त्यामुळे मनामध्ये कंटाळा आणि उदासीनता साचते. तिचा निचरा करून आपल्या मनाला रिचार्ज करण्याचे काम सण आणि उत्सव करत असतात. इतर देशांच्या तुलनेत भारतामध्ये सण आणि उत्सवांचे प्रमाण बरेच जास्त आहे. जुलै हा मुख्य पावसाचा महिना सोडला तर प्रत्येक महिन्यात किमान दोन सण तरी असतातच. भारतातील या सण आणि उत्सवांमागे आपल्याकडील हजारो वर्षांची परंपरा असलेल्या संस्कृतीचा धागा आहे, तसेच यामागे समाजाचे अर्थकारणही आहे. सण आणि उत्सव साजरे करण्यासाठी लोक त्यासाठी लागणार्या वस्तूंची खरेदी करतात, इतकेच नाही, दिवाळी तसेच इतर शुभ मुहूर्तांवर सोनेचांदी, गाडी, फ्लॅट यांची खरेदी करतात. त्यामुळे अर्थव्यवस्थेला चालना मिळत असते. त्यामुळे भारतात सहसा मंदी येत नाही, कारण या सण आणि उत्सवांमुळे लोक यथाशक्ती खरेदी करतात. परिणामी आर्थिक उलाढाल सुरू राहते. त्यामुळे त्याचे विशेष महत्त्व आहे. पण अलीकडच्या काळात उत्साह निर्माण करणार्या या सण आणि उत्सवांना उन्मादी स्वरूप येत आहे, हीच दिवसेंदिवस चिंता वाढवणारी बाब ठरत आहे.*

*सण आणि उत्सव संयमितपणे साजरे करण्याची पूर्वी पद्धत होती, पण जसा काळ पुढे सरकत जात आहे, तसे त्याला अधिकाधिक आक्रमक आणि आक्रस्ताळी स्वरूप येत आहे. ही आक्रस्ताळीपणाची लाट आता शहरांमधून गाव खेड्यांपर्यंत पोहोचत आहे. मोबाईल फोन, समाज माध्यमे याचे वेगवान वहन करत आहेत. त्यामुळे तुमच्यापेक्षा आम्हीही काही कमी नाही, अशा प्रकारची स्पर्धा सुरू झालेली आहे. आता लोकांचे पैशाचे स्त्रोत वाढले आहेत, त्यामुळे सण आणि उत्सव दणक्यात साजरे केले जातात. इतकेच नव्हे तर काही सार्वजनिक उत्सव तर आता भरभक्कम वर्गणीच्या माध्यमातून पैसा कमावण्याचा व्यवसाय बनून गेले आहेत. या उत्सवांना शिस्तीच्या चौकटीतून बाहेर काढण्याला एक महत्त्वाचे कारण ठरत आहे, ते म्हणजे या उत्सवांना राजकीय मंडळींनी आपल्या ताब्यात घेतले.*

*उत्सवांसाठी नेते मंडळी आपल्या भागातील मंडळांना निधी देतात, आपल्या फोटोंचे बॅनर लावून आपली जाहिरात करून घेतात. या उत्सवांमध्ये राजकीय नेत्यांचा प्रवेश झाल्यानंतर यात एक बदल झालेला आहे तो म्हणजे या उत्सवांनी आक्रमक रूप धारण केलेले आहे. मंडळांमध्ये प्रचंड स्पर्धा सुरू झालेली आहे. या साजरीकरणाला आता धार्मिक आणि सांस्कृतिक स्वरूपापेक्षा व्यावसायिक स्वरूप आलेले आहे. अगदी मुंबईत पाहिल्यास असे दिसेल की, गणेश चतुर्थीच्या आधीच सुमारे दीड महिनाभर रस्त्याच्या बाजूला आडोसा उभा करून त्यात अनेक गणेशमूर्ती विक्रीसाठी आणून ठेवलेल्या असतात. हे उत्सव साजरे करण्यामध्ये फक्त एकच धर्मीय नाहीत, तर विविध धर्मीयांचा समावेश आहे. कारण प्रत्येकाला आपले उत्सव दणक्यात साजरे करायचे असतात.*

*आता लोकांकडे बराच पैसाही उपलब्ध असल्यामुळे हे साजरीकरण अनेकदा शक्तिप्रदर्शनाचे वळण घेते. त्यामुळे सण आणि उत्सवांच्या माध्यमातून सामाजिक सौहार्द नांदण्यापेक्षा अनेकदा सामाजिक कलह निर्माण होतो. यामध्ये नको जीव होतो तो सामान्य माणसांचा. कारण हे सण आणि उत्सव साजरे करताना आकाश फाटून जाईल असे प्रचंड आवाजाचे मोठे डीजे आणि स्पिकर लावले जातात. त्याचा अनेक लोकांना प्रचंड त्रास होते. कानाचे पडदे फाटून जातील इतकेच नव्हे तर हृदयविकाराचा झटका येऊन माणूस मरेल, इतकी त्या आवाजाची तीव्रता असते. या आवाजाला न्यायालयाने निर्बंध घातलेले आहेत, पण ती पाळली जात नाही. पोलिसांची अवस्था मूक प्रेक्षकासारखी हतबल झालेली असते. आवाजाची कुणी तक्रार केली तर ते त्याकडे दुर्लक्ष करतात. कारण त्यांच्यावर आवाज करणार्यांचा दबाव असतो, त्यांचे जे गॉडफादर नेते असतात, त्यांचा दबाव असतो. त्यामुळे नाचूद्या बिनधास्त होऊद्या आवाज, अशीच स्थिती असते. त्यामुळे एकेकाळी लोकांचा उत्सव वाढवणार्या या सण आणि उत्सवांमुळे सामान्य माणसांना जगणे अवघड झाले आहे. कारण या उत्सवांना उन्मादी स्वरूप येऊ लागले आहे.*

*आपले मोठेपण मग ते आपल्या धर्माचे असो, आपल्या देवाचे असो, आपल्या गुरूंचे असो, नाही तर आपल्या मंडळाचे असो, ते सिद्ध करण्यासाठी जास्तीत जास्त मोठ्या आवाजात साजरीकरण केले जाते. या सण, उत्सवांच्या साजरीकरणांनी आता बेफाम गोंधळाचे रूप घेतलेले आहे. अलीकडच्या काळात तर सण आणि उत्सव आले की, उत्साह निर्माण होण्यापेक्षा अनेकांच्या छातीत धडकी भरते. दिवाळीच्या काळात फटाके वाजवण्यावर कितीही मर्यादा आणल्या तरी अनेक लोक अलीकडच्या काळात फटाके वाजवण्याचा आनंद घेण्यापेक्षा त्या जाळून प्रचंड मोठे आवाज करण्यात आनंद मानतात. इतरांना त्याचा किती त्रास होतो याच्याशी त्यांना काही घेणेदेणे नसते. खरे तर सण आणि उत्सव कुठल्याही धर्माचे असोत, सगळ्यांनीच आपल्या साजरीकरणाचा इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. लोकशाहीमध्ये लोकांना स्वातंत्र्य असते, पण त्याचे स्वैराचारात रुपांतर होता कामा नये. सरकारनेही यावर वचक ठेवायला हवा. विदेशामध्येही भारतीयांच्या अशा आक्रस्ताळी सण सिलिब्रेशनमुळे तिकडचे लोक आता गो बॅक इंडियन्स असे म्हणत आहेत. एकूणच काय तर सण आणि उत्सव हे आपले सांस्कृतिक सामर्थ्य असले तरी त्याला उन्मादीपणा येत असल्यामुळे ते त्रासदायक ठरू लागले आहेत. त्यामुळे सामाजिक भान ठेवून आवाजावर मर्यादा घालण्याची गरज आहे. ध्वनीसोबत जल, वायू प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्यायला हवी.*

# चेंडो गावातही कोरडासारख्या दुर्घटनेचा धोका

## प्रशासनाने धडा घेतला का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धारणी :** मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील कोरडा गावात जलापूर्ति योजनेसाठी खोदलेल्या खड्ड्यात साचलेल्या पाण्यात बुडून चार वर्षीय नायरा भूसुम या चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, धारणी पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम चेंडो गावातही अशाच दुर्घटनेची शक्यता निर्माण झाली आहे. गावातील जुन्या सोख खड्ड्यात मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचले असून, या ठिकाणी कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता आणि संताप व्यक्त होत आहे.ग्रामस्थांच्या माहितीनुसार, चेंडो गावातील हा सोख खड्डा खोल असून त्याभोवती सुरक्षा कठडे किंवा कुंपण करण्यात आलेले नाही. तसेच धोक्याची सूचना देणारे फलकही लावण्यात आलेले नाहीत. पावसासोबतच जलापूर्ति योजनेच्या पाइपलाइनमधून होणाऱ्या गळतीमुळे खड्डा पूर्णपणे पाण्याने भरला आहे. त्यामुळे त्याची प्रत्यक्ष खोली लक्षात येत नसल्याने धोका अधिकच वाढला आहे.गावातील लहान मुले खेळताना या परिसरात जात असल्याने एखादे मूल खड्ड्यात पडून गंभीर दुर्घटना घडण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. कोरडा येथील घटनेनंतर संबंधित ग्रामसेवक, कंत्राटदार कंपनी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंत्यांवर




कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्या घटनेतून प्रशासनाने पुरेसा धडा घेतला नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.मेळघाटातील विविध गावांमध्ये योजनांसाठी खोदलेले अनेक खड्डे अद्याप उघडे असून, त्यात पावसाचे पाणी साचले आहे. त्यामुळे अशा सर्व धोकादायक ठिकाणांचे तातडीने सर्वेक्षण करून सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. चेंडोतील खड्डा त्वरित बुजवावा किंवा त्याभोवती मजबूत सुरक्षा कुंपण उभारून इशारा फलक लावावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्याऐवजी दुर्घटना टाळण्यासाठी आधीच खबरदारी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे चेंडो गावातील संभाव्य धोका तातडीने दूर करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# पर्यटनासाठी गेलेल्या जाजू कॉलेजच्या ३ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू

## मित्रांसोबत फिरायला गेलेल्या तरुणांवर काळाचा घाला; दोघे बचावले, एकावर उपचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८यवतमाळ–** प्रेक्षणीय टाकळी तलावाच्या परिसरात मित्रांसोबत पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी गेलेल्या तरुण विद्यार्थ्यांवर अचानक काळाने झडप घातली. तलावाच्या खोल पाण्याचा अंदाज न आल्याने जाजू कॉलेजमधील तीन विद्यार्थ्यांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. या घटनेमुळे यवतमाळ शहरासह शैक्षणिक वर्तुळात तीव्र हळहळ होत आहे. पियूष यादव, प्रथमेश यादव आणि प्रसाद सातपुते (सर्व रा. यवतमाळ) अशी तलावात बुडून मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील नामांकित जाजू कॉलेजमधील आठ मित्रांचा एक ग्रुप सोमवारी दुपारी फिरण्यासाठी टाकळी तलाव परिसरात गेला होता. निसर्गरम्य वातावरणात फिरल्यानंतर त्यांच्यातील पाच तरुण तलावाच्या पाण्यात उतरले. मात्र, पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने अचानक दोन तरुणांच्या नाका-तोंडात पाणी गेले. घाबरलेल्या या दोघांनी प्रसंगावधान राखले. त्यांनी तातडीने पोहून बाहेर येत स्वतःचा जीव वाचवला. मात्र, उर्वरित तिघे



मित्र पाण्याच्या तीव्र ओढीत खोलवर ओढले गेले. ते बुडाले. घटना घडताच तलाव परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने धाव घेतली. पाण्यातून सुखरूप बाहेर आलेल्या दोघांपैकी एकाची प्रकृती बिघडली. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच पोलिस प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी धावले. स्थानिक मच्छिमार तसेच आपत्ती व्यवस्थापन दलाच्या मदतीने तलावात शोधमोहीम युद्धपातळीवर राबवण्यात आली. उशिरा तिघांचे मृतदेह शोधण्यात आपत्ती व्यवस्थापन पथकाला यश आले. या घटनेची माहिती मिळताच मुलांच्या नातेवाईकांनी तलावाकडे धाव घेतली. परिसरात हृदयद्रावक वातावरण निर्माण झाले आहे.


### काही पर्यटनाची ठिकाणे ठरताय मृत्यूचा सापळा

काही दिवसांपूर्वीच यवतमाळ जवळील बोरगाव धरण परिसरात सेल्फी आणि रील्स काढण्याच्या नादात दोन २१ वर्षीय तरुण विद्यार्थिनींना आपला जीव गमवावा लागला होता. सोशल मीडियाच्या क्रेझपोटी घडलेल्या या दुर्दैवी घटना ताजी असतानाच, आता टाकळी तलावात जाजू कॉलेजच्या तीन तरुण बुडाल्याची घटना समोर आली आहे. एकापाठोपाठ घडलेल्या दोन मोठ्या घटनांनंतर आता तरी स्थानिक प्रशासनाने धोकादायक ठिकाणी निर्बंध घालावे.

# अमरावती विद्यापीठात ‘अमृत-एसआरआयएफ’ योजनेचा शुभारंभ

## विद्यार्थी, नवउद्योजकांना स्टार्टअपची नवी दिशा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अॅण्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) आणि अमृत यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या ‘अमृत-एसआरआयएफ’ योजनेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते आणि अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या हस्ते योजनेचे उद्घाटन झाले.विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक, नवउद्योजक आणि स्टार्टअप्सना उद्योग-व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक मार्गदर्शन, इन्क्युबेशन सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन तसेच उद्योजकता विकासासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही



योजना सुरू करण्यात आली आहे.याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे संचालक, अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. तसेच अमृतचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर आणि जिल्हा व्यवस्थापक ऋषिकेश कथलकर यांचीही उपस्थिती होती.‘अमृत-एसआरआयएफ’ योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थी व नवउद्योजकांना नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यावसायिक स्वरूप देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन मिळणार आहे. नवकल्पना विकसित करणे, स्टार्टअप उभारणी, व्यवसाय मॉडेल तयार करणे, बाजारपेठेची समज विकसित करणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व मेंटॉरिंग तसेच इन्क्युबेशन सुविधा या माध्यमातून युवकांना सक्षम केले जाणार आहे.एसआरआयएफकडून विद्यार्थ्यांच्या व संशोधकांच्या अभिनव कल्पनांना स्टार्टअप आणि उद्योगांमध्ये रूपांतरित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. अमृतच्या सहकार्यामुळे या प्रयत्नांना आणखी बळ मिळणार असून, युवकांना आपल्या कल्पनांचे प्रत्यक्ष व्यवसायात रूपांतर करण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळणार आहे.‘नवकल्पनेतून उद्योजकता आणि उद्योजकतेतून रोजगारनिर्मिती’ या संकल्पनेला चालना देणारी ही योजना अमरावतीसह विदर्भातील स्टार्टअप आणि उद्योजकता परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.-

# शहरात सर्व जड वाहनांना सकाळी साडे सहा ते रात्री साडे नऊ पर्यंत बंदी

## कृषी मालासाठी सकाळी ११ ते दुपारी ४, गौण खनिजासाठी सकाळी ८.३० ते १२.३०

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक विभागाने १७ ऑगस्टपासून शहरातील जड व काही हलक्या मालवाहू वाहनांच्या प्रवेशावर निर्बंध लागू केले आहेत. नवीन नियमांनुसार सकाळी ६.३० ते रात्री ९.३० या वेळेत संबंधित वाहनांना शहरात प्रवेश करता येणार नाही.ज्या व्यावसायिक हलक्या मालवाहू वाहनांचे वजन किंवा भारसंहित वजन दोन टनांपेक्षा अधिक आहे, तसेच अतिअवजड आणि मल्टिअॅक्सल वाहनांचा या प्रवेशबंदीमध्ये समावेश करण्यात आला आहे. मात्र, नागरिकांच्या सोयीसाठी आणि अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवण्यासाठी काही वाहनांना पूर्णपणे सवलत देण्यात आली आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस, कचरा संकलन, रुग्णवाहिका आणि अग्निशामक दलाची वाहने या निर्बंधातून वगळण्यात आली




आहेत.अन्नधान्य व कृषी मालाची वाहतूक करणाऱ्या वाहनांना दररोज सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत शहरात प्रवेशाची परवानगी राहणार आहे. त्यामुळे शेतमालाची आवक-जावक आणि बाजारपेठेतील व्यवहारांवर परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात आली आहे.गौण खनिज वाहतुकीस वेळेची सवलतगौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांना दररोज सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० या वेळेत प्रवेशाची मुभा देण्यात आली आहे. रविवारी मात्र सकाळी ६.३० ते ११ आणि दुपारी २ ते ४ या वेळेत गौण खनिज वाहतुकीला परवानगी राहणार आहे. रेडी मिक्सर वाहनांनाही दररोज सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० आणि रविवारी निश्चित केलेल्या वेळेत वाहतुकीची सवलत देण्यात आली आहे.

# एसआयआर मोहीम संपली, ३.५२ लाख मतदार यादीबाहेरच

## २४ ऑगस्टला प्रारूप यादी जाहीर, पात्र मतदारांना नोंदणीची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती–** मतदार यादीच्या सूक्ष्म पुनरिक्षणाची (डखठ) मोहीम आज संपली असून या मोहिमेनंतरही जिल्ह्यातील ३ लाख ५२ हजार २६० मतदार अजूनही यादीबाहेरच असल्याची माहिती समोर आली आहे. ही संख्या एकूण मतदारसंख्येच्या सुमारे १४ टक्के आहे.या यादीबाहेर असलेल्या मतदारांमध्ये मृत व्यक्ती, स्थलांतरित झालेले नागरिक आणि इतर कारणांमुळे मूळ ठिकाणी नसलेल्यांचा समावेश आहे. या मतदारांच्या नावांची यादी जिल्हा प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांसह राजकीय पक्षांनाही पुरवण्यात आली आहे.दरम्यान, ज्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत, त्यांची प्रारूप यादी आगामी २४ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघांच्या कार्यालयात जाहीर केली जाईल. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, जिल्ह्याची संपूर्ण मतदार यादी नव्याने तयार करण्याचे काम गेल्या दीड महिन्यांपासून सुरू होते.



या प्रक्रियेत राजकीय पक्षांनी नेमलेले बीएलए (ब्लॉक लेव्हल एजंट) आणि प्रशासनाने नियुक्त केलेले बीएलओ (ब्लॉक लेव्हल ऑफिसर) यांनी एकत्रितपणे मतदारांच्या घरी जाऊन माहिती गोळा केली. त्यानंतर गणना अर्ज भरून घेऊन ती नावे डिजिटल पद्धतीने संगणकीकृत करण्यात आली.या संगणकीकृत यादीचे प्रारूप यापूर्वीच घोषित होणार होते, परंतु महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांचे काम रखडल्यामुळे या घोषणेसाठी दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार, ही यादी आता २४ ऑगस्ट रोजी जाहीर केली जाईल, अशी माहिती जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.गेल्या लोकसभा निवडणुकीवेळी अस्तित्वात असलेल्या जुन्या यादीनुसार जिल्ह्यात एकूण २५ लाख ४५ हजार ६७७ मतदार होते. यापैकी २१ लाख ८२ हजार ३४८ (८६.१२ टक्के) मतदारांना नव्या यादीत स्थान मिळाले आहे. परिणामी, ३ लाख ५२ हजार २६० (१३.८४ टक्के) मतदार अजूनही यादीबाहेर आहेत.। मतदारांच्या वगळणीची कारणे तपासली असता, तब्बल १ लाख ९ हजार ३२३ मतदार मृत असूनही त्यांची नावे जुन्या यादीत कायम होती, हे स्पष्ट झाले आहे. याशिवाय, २२ हजार ४३ मतदार हे सरकारी व निमसरकारी अधिकारी-कर्मचारी असून, ते सध्या अमरावती जिल्ह्यात राहत नाहीत.५५ हजार ७२४ मतदारांची नावे दोन ठिकाणी नोंदवलेली असल्यामुळे त्यांची नावे आता एकदाच नोंदवण्यात आली आहेत. यामध्ये सर्वाधिक नावे अमरावती व बडनेरा या शहरी मतदारसंघातील आहेत.ज्या पात्र नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळली गेली आहेत किंवा ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांना पुन्हा एकदा नाव दाखल करण्याची संधी देण्यात आली आहे. ही संधी २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध असेल.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# हरिसालमध्ये वाघिणीसह चार शावकांचे दर्शन

## पर्यटकांमध्ये उत्साह, ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८हरिसाल :** मेलघाट व्याघ्र प्रकल्पातील हरिसाल-चौराकुंड परिसरात वाघांची वाढती संख्या वन्यजीवप्रेमी आणि पर्यटकांसाठी उत्साहाची बाब ठरत आहे. हरिसाल वनपरिक्षेत्रात सुमारे चार ते पाच महिन्यांचे चार वाघाचे शावक आढळून आले आहेत. या परिसरात वाघिणीसह चार शावक आणि अन्य वाघ मिळून सुमारे सहा ते सात वाघांचा वावर असल्याचे सांगितले जात आहे.मेलघाटमधील गगनमल आणि सिपना वन्यजीव अभयारण्य परिसरात बाघांची संख्या वाढत असल्याचे संकेत मिळत असून, वन्यजीव संवर्धन आणि पर्यावरणाच्या दृष्टीने ही सकारात्मक बाब मानली जात आहे. जंगल सफारीदरम्यान पर्यटकांना वाघांसह अस्वल,



बिबट्या, मोर, हरीण, सांबर, नीलगाय यांसह विविध वन्यजीवांचे दर्शन होत आहे.वाघांच्या वाढत्या संख्येमुळे पर्यटक आणि निसर्गप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी हरिसाल परिसरातील ग्रामस्थ तसेच शेतात काम करणाऱ्या नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. वन्यजीवांचा वावर वाढल्याने नागरिकांनी जंगलालगतच्या भागात विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.क्षेत्रात वाघांची संख्या वाढणे ही मेलघाटसाठी आनंदाची आणि पर्यावरणाच्या दृष्टीने चांगली बातमी आहे. मात्र, वन्यजीव दिसून आल्यास नागरिकांनी तत्काळ स्थानिक वनविभागाशी किंवा १९२६ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे हरिसाल वन्यजीव विभागाच्या वनक्षेत्र अधिकारी शुभांगी राऊत यांनी सांगितले.

# ...अखेर कोणार्कच्या कंत्राटातील सर्व अडथळे दूर

## भाग दोनच्या कंत्राटास स्थायी समितीची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती-** स्वच्छतेचा कंत्राट देण्यात आलेल्या मात्र वादग्रस्त ठरलेल्या कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला स्थायी समितीने सोमवारी (ता. १७) झालेल्या सभेत भाग दोनच्या कामांना मंजुरी प्रदान केली. प्रशासनाने प्रशासकीय राजवटीत केलेल्या कंत्राटावेळी भाग दोनसाठी स्थायी समितीची मंजुरी घेतली नव्हती. आता देण्यात आलेल्या मंजुरीमुळे कोणार्क कंपनीचा कंत्राट पूर्ण झाला असून त्यांचे प्रलंबित देयक निघण्याचाही मार्ग सुकर झाला आहे. यासोबतच भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणासाठी झोननिहाय कंत्राटदार नियुक्त करण्याचे निर्देश



प्रशासनाला दिले आहेत.

महापालिका क्षेत्रातील स्वच्छतेच्या कामाचे दोन भाग करण्यात आले असून भाग एकमध्ये शहरातील कचरा वहन व भाग दोनमध्ये दैनंदिन कचरा संकलन, यांचा समावेश आहे. दोन्ही कंत्राट तत्कालीन प्रशासकीय राजवटीत कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीला देण्यात आले आहेत. सात वर्षांसाठी २८० कोटी रुपयांचा हा कंत्राट आहे. प्रशासकीय राजवटीत भाग एकच्या कंत्राटास मंजुरी देत असताना भाग दोनसाठी एकाच झोनच्या कंत्राटास स्थायी समितीची मंजुरी घेण्यात आली होती. चार झोनसाठी मात्र मंजुरी घेण्यात आली नव्हती. त्यामुळे प्रशासनाने प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समितीकडे पाठविला होता. त्यावर परिपूर्ण अहवाल देण्याचे निर्देश देण्यात आले होते. प्रशासनाकडून स्पष्टीकरण आल्यानंतर झालेल्या स्थायी समितीच्या सभेत मंजुरी प्रदान करण्यात आली असल्याचे सभापती अविनाश मार्डीकर यांनी सांगितले.

कोणार्क कंपनीला काम करण्यासंदर्भात काही निर्देशही देण्यात आले असल्याचे सभापती मार्डीकर यांनी सांगितले. त्यानुसार प्रत्येक प्रभागांत ५४ कामगार असणे बंधनकारक करण्यात आले असून त्यांची हजेरी रोज व्हावी, वाहनांच्या पार्किंगची सोय, कंपोस्ट डेपोवर कचऱ्याचे मोजमाप, जीपीएस प्रणाली बंधनकारक करण्यात आली आहे.

### झोननिहाय कुत्र्यांचे निर्बिजीकरण

वर्षाला दोन हजार भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाचे उद्दीष्ट शहरातील कुत्र्यांची संख्या बघता फारच कमी असल्याने झोननिहाय उद्दीष्ट निश्चित करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या. शहरात तीस हजारांहून अधिक कुत्र्यांची संख्या असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिवर्ष दोन हजार कुत्र्यांचे उद्दीष्ट निश्चित करण्याचे व त्यासाठी झोननिहाय कंत्राटदार नियुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासाठी खुली निविदा प्रक्रिया करण्यासही सांगण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रात पाच झोन आहेत. विद्यमान स्थितीत पशुवैद्यक विभागात पशुवैद्यक अधिकारी नसल्याने ही रिक्त जागा भरण्यासाठी पात्रताधारक अधिकारी नियुक्तीची प्रक्रिया राबविण्यात यावी किंवा मानधन तत्त्वावर सेवानिवृत्त पात्रताधारक अधिकारी नियुक्त करण्यासही सांगण्यात आले आहे.

# डोमी शाळेत एकच शिक्षक

## गावकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

### आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विशेष ग्रामसभा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ चिखलदरा**

चिखलदरा तालुक्यातील डोमी येथील प्राथमिक शाळेत केवळ एकच शिक्षक कार्यरत असल्याने गावकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. अतिरिक्त शिक्षकाच्या मागणीसाठी गावकऱ्यांनी नुकतीच एक विशेष ग्रामसभा घेतली, ज्यात या विषयावर सखोल चर्चा करण्यात आली.

शिक्षणाचा अधिकार कायदा (आरटीई) विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी देतो. या कायद्यानुसार विद्यार्थीसंख्या आणि शाळेच्या स्वरूपानुसार आवश्यक शिक्षकसंख्या निश्चित केली जाते. मात्र, डोमीसारख्या अतिदुर्गम आणि 'कट ऑफ व्हिलेज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावातील जिल्हा परिषद शाळेत एकाच शिक्षकावर संपूर्ण शाळेची जबाबदारी आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार आदिवासी समाजातील मुलांना नाही का? असा थेट सवाल यावेळी ग्रामस्थांनी उपस्थित केला. अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना आधीच अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, अशा परिस्थितीत पुरेसे शिक्षक नसणे हे त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर परिणाम करणारे आहे, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

ग्रामपंचायतीत झालेल्या चर्चेनंतर, संपूर्ण गावाच्यावतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि राज्याच्या शिक्षणमंत्र्यांना पत्र पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डोमी शाळेला तातडीने अतिरिक्त शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन शिक्षकाची नियुक्ती करावी, अन्यथा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत राहील, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. डोमीच्या शाळेत शिक्षकांची नियुक्ती हा केवळ एका गावाचा प्रश्न नसून, अतिदुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्काशी संबंधित प्रश्न आहे. त्यामुळे प्रशासन या मागणीकडे किती गांभीर्याने पाहते आणि किती लवकर निर्णय घेते, याकडे आता संपूर्ण मेळघाटाचे लक्ष लागले आहे.

# नेरपिंगळाई गावाला होतोय दूषित पाणीपुरवठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ नेरपिंगळाई**

नेरपिंगळाई येथे ग्रामपंचायतमार्फत करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्याच्या गुणवत्तेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. येथील वॉर्ड क्रमांक एकमध्ये नळाद्वारे गढूळ, मळकट व दूषित पाणीपुरवठा होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. नळातून येणारे पाणी पाहता ते पिण्यायोग्य आहे की नाही, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विशेष म्हणजे, नेरपिंगळाईतील केवळ एका वॉर्डाची ही समस्या नसून यापूर्वीदेखील विविध वॉर्डांमधून दूषित व गढूळ पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, वारंवार तक्रारी होऊनही ग्रामपंचायत प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

पिण्याचे पाणी हे नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित असताना त्याच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष करणे गंभीर बाब आहे. दूषित पाण्यामध्ये रोगजंतू किंवा सांडपाण्याचे मिश्रण असल्यास अतिसार, उलटच्या, पोटाचे विकार, कावीळ, टायफाइड, कॉलरा तसेच विविध जलजन्य संसर्ग होण्याचा धोका वाढू शकतो. विशेषतः लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि रोगप्रतीकारशक्ती कमी असलेल्या नागरिकांवर त्याचा अधिक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे केवळ पाणीपुरवठा सुरू आहे एवढे पुरेसे नसून पाणी प्रत्यक्षात पिण्यायोग्य आहे का, याची नियमित तपासणी करणे ही ग्रामपंचायतची जबाबदारी आहे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. दूषित पाणीपुरवठ्याचे एक संभाव्य कारण म्हणजे पाणीपुरवठा जलवाहिनीमध्ये असलेली गळती (लिकेज).



अनेक ठिकाणी पाण्याच्या जलवाहिनीजवळ नाल्या, सांडपाणी किंवा चिखल असल्यास जलवाहिनीमधील कमी दाबाच्या काळात बाहेरील दूषित पाणी आत जाण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे वॉर्ड एकसह संपूर्ण गावातील पाणीपुरवठा जलवाहिनीची तातडीने तपासणी करून लिकेज शोधावे, खराब जलवाहिनी दुरुस्त करावी आणि ज्याठिकाणी सांडपाणी व पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी एकमेकांना छेदतात, त्याठिकाणांची विशेष तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. ग्रामपंचायतने केवळ तक्रार आल्यानंतर तात्पुरती दुरुस्ती करण्याऐवजी संपूर्ण पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करण्याची गरज आहे. पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता, जलवाहिनीची स्थिती, गळतीची ठिकाणे, जलस्रोताची स्वच्छता आणि पाण्याच्या निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया याबाबत प्रत्यक्ष पाहणी करणे आवश्यक आहे. तसेच पाणीपुरवठ्याचे नमुने अधिकृत प्रयोगशाळेत तपासून त्याचा अहवाल नागरिकांसमोर जाहीर करावा, अशी मागणीही पुढे येत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रश्न सुटत नसल्याने आता नागरिक आक्रमक झाले आहेत.

आमच्या घरातील नळाला पाणी येणे महत्त्वाचे आहेच; मात्र ते पिण्यायोग्य आणि सुरक्षित असणे त्याहून महत्त्वाचे आहे, अशी संतप्त भावना नागरिकांनी व्यक्त केली. ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने वॉर्ड एकमधील दूषित पाणीपुरवठ्याची पाहणी करून लिकेज शोधावे, जलवाहिनी दुरुस्त करावी, पाणीपुरवठा यंत्रणा स्वच्छ करावी आणि पाण्याची प्रयोगशाळेत तपासणी करावी. अन्यथा नागरिकांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा नागरिकांकडून देण्यात आला आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित हा प्रश्न आता केवळ 'पाणीपुरवठ्याची तक्रार' न राहता ग्रामपंचायत प्रशासनाच्या कार्यक्षमतेची कसोटी ठरणार आहे. प्रशासनाने आणखी किती तक्रारींची वाट पाहायची, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

# चिखलदऱ्यात पर्यटक असुरक्षित; रस्त्यांवर दरड, जीवितहानीचा होऊ शकतो धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८चिखलदरा-**

चिखलदरा पर्यटन स्थळावर दरवर्षी पावसाळ्यात लाखो पर्यटक भेट देतात. मात्र, परतवाडा ते चिखलदरा आणि चिखलदरा ते घटांग या मार्गावरील प्रवासात पर्यटक असुरक्षित असल्याचा गंभीर धोका समोर आला आहे. या मार्गावर पावसाळ्यात दरवर्षी दरडी व मोठे दगड कोसळण्याच्या घटना घडत असतात. चिखलदरा रस्त्यालगतच्या पहाडांवर अतिशय मोठ्या आकाराचे सुटे दगड अडकलेले दिसत असून, ते कधीही मुख्य रस्त्यावर कोसळण्याची दाट शक्यता आहे, हे विशेष.

विकेंड आणि पावसाळी हंगामात चिखलदऱ्यात गर्दी होत असताना, प्रवाशांचे जीवन धोक्यात आले आहे. या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष वेधणे ही गरज बनली आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेचा हा प्रश्न मुख्यमंत्री तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाच्या दरबारात गांभीर्याने उपस्थित केला जावा, अशी मागणी जोर धरत आहे.

उपाययोजनांची मागणी

भूवैज्ञानिक सर्वेक्षण : जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी




या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तत्काळ निर्देश द्यावेत आणि परतवाडा-चिखलदरा-घटांग रस्त्याच्या आजूबाजूच्या डोंगररांगांचे तज्ज्ञांमार्फत जिऑलॉजिकल सर्वेक्षण करावे.

कायमस्वरूपी नियोजन : रस्त्यांवर लटकलेले धोकादायक दगड हटवून भविष्यात होणाऱ्या भूस्खलनाचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने राबवाव्यात.

४ ऑगस्ट : परतवाडा-चिखलदरा- घटांग या मार्गावर ४ ऑगस्ट २०२६ रोजी अशाप्रकार मोठे दगड रस्त्यावर पडले होते.

वर्ष २०२४: चिखलदरा ते घटांग या मार्गावर सन २०२४ मध्ये भुस्खलनानंतर रस्त्यावर दरड कोसळून वाहतूक ठप्प पडली होती.

घटांग ते डोमा या मार्गावर दरड कोसळण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडतात. मात्र, परतवाडा ते चिखलदरा या मार्गावर अतिशय थोड्या प्रमाणात दरडी कोसळतात, आणि त्या देखील प्रशासनातर्फे त्वरित हटवून हा मार्ग वाहतुकीसाठी तातडीने पूर्ववत केला जातो. जिऑलॉजिकल सर्व्हे होऊ शकतो, मात्र सध्या तशी गाईडलाईन नाही.

-नीलेश चौधरी, उप अभियंता, बी अँड सी.

# जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी कार्यालयात असंतोष

## कर्मचाऱ्यांनी घेतली सामूहिक रजा : वरिष्ठांकडे केली लेखी तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. मागील काही दिवसांपासून शिक्षण विभागात अधिकारी आणि कर्मचारी, असा सामना रंगला आहे. कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा घेतल्याने माध्यमिक शिक्षण विभागाच्या कामकाजावर परिणाम झाला आहे. कामाचा अतिरिक्त दबाव व वरिष्ठांकडून अधिकार क्षेत्राबाहेरील कामे सांगितली जात असल्याचा आरोप काही कर्मचाऱ्यांनी या तक्रारीमध्ये केला आहे.

. कर्मचाऱ्यांच्या मते, कार्यालयीन कामकाजाचे वाटप



करताना स्पष्ट लेखी आदेश दिले जात नसल्याने जबाबदारी निश्चित करण्याबाबत संभ्रम निर्माण होत आहे. काही कामे तोंडी स्वरूपात सांगितली जात असून, ती निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी दबाव आणला जात असल्याचीही तक्रार कर्मचाऱ्यांची आहे. काम पूर्ण न झाल्यास कठोर शब्दांत विचारणा केली जाते. त्यामुळे कार्यालयात मोकळेपणाने काम करणे कठीण झाल्याचे काही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी काही कर्मचारी रजेवर गेल्याने कामाचा अतिरिक्त भार इतर कर्मचाऱ्यांवर पडला आहे. मागील काही दिवसांत विभागातील अनेक कर्मचारी वैद्यकीय, अर्जित किंवा अन्य प्रकारच्या रजेवर गेले आहेत. त्यामुळे कार्यालयात उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा भार पडत असून, दैनंदिन प्रशासकीय कामकाजासह शिक्षकांच्या सेवाविषयक प्रकरणांच्या निपटाऱ्यावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वेतननिश्चिती, सेवानिवृत्तीविषयक प्रस्ताव, शिक्षकांची मान्यता, पदोन्नती, न्यायालयीन प्रकरणे, वैद्यकीय देयके आणि इतर सेवाविषयक प्रस्तावांसाठी जिल्हाभरातील शिक्षक व कर्मचारी माध्यमिक शिक्षण विभागाशी नियमित संपर्क साधतात. कर्मचारी अनुपस्थितीचे प्रमाण वाढल्यास अशा प्रकरणांच्या निपटाऱ्यास विलंब होऊन त्याचा थेट परिणाम शिक्षक व कर्मचाऱ्यांवर होऊ शकतो, असे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत निष्पक्ष चौकशी करावी, संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्रपणे बाजू ऐकून घ्यावी; कर्मचाऱ्यांच्या रजेची कारणे, कामाचे वाटप आणि कार्यालयीन आदेशांची पडताळणी करावी, अशी मागणी पुढे येत आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत कोणत्याही कर्मचारी किंवा अधिकाऱ्याविषयी पूर्वग्रह निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचीही गरज व्यक्त केली जात आहे.

शिक्षण विभागात कामाची अधिक पेंडन्सी असल्यामुळे मी काही कर्मचाऱ्यांना शनिवारी व रविवारी सुटीच्या दिवशीसुद्धा कार्यालयात बोलविते, त्यामुळे त्यांची मानसिकता खराब झाली असावी. मात्र त्यांना कुठलीही नियमबाह्य कामे सांगितली जात नाहीत, तर कार्यालयीन रखडलेली कामेच पूर्ण करण्यास सांगितले आहे. आज काही कर्मचारी रजेवर गेल्याची माहिती आहे.

**-प्रिया देशमुख,** शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. अमरावती.

### कामांची लेखी जबाबदारी निश्चित करा

नियमित पदाशी आणि कार्यविवरणाशी संबंधित नसलेली कामे देण्यात येत असतील तर त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे स्पष्ट लेखी आदेश देण्यात यावे. संबंधित काम कोणत्या नियमांतर्गत व कोणत्या अधिकाऱ्याच्या आदेशाने सोपविण्यात आली, हेही नमूद करण्यात यावे, अशी मागणी कर्मचारीवर्गातून होत आहे. तोंडी आदेशांमुळे भविष्यात प्रशासकीय किंवा आर्थिक जबाबदारी निश्चित करताना कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली.

# अमरावतीच्या आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना विषबाधा, एका विद्यार्थ्याचा मृत्यू













**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अमरावती शहरातील महर्षी पब्लिक स्कूल येथील आदिवासी आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना उलटी आणि जुलाबचा त्रास झाल्याने खळबळ उडाली. या आजारामुळं सात विद्यार्थी गंभीर आजारी असून, इयत्ता अकरावीचा विद्यार्थी राजेश बेठेकर याचा यात मृत्यू झालाय.आज या प्रकरणात तक्रार दाखल करण्यात येणार आहे

महर्षी पब्लिक स्कूल या ठिकाणी असणाऱ्या आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्यामुळं अनेकांना उलटी आणि जुलाबचा त्रास सुरू झाला. १४ ऑगस्ट रोजी आजारी विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यानं शाळा प्रशासनानं या विद्यार्थ्यांना उपचार देण्याकरिता रुग्णालयात दाखल करण्याऐवजी थेट त्यांना घरी पाठवण्याची व्यवस्था केली. राजेश बेठेकर याला देखील त्याच्या चिखलदरा तालुक्यातील करंजखेडा या गावात पाठवण्यात आलं. त्याची प्रकृती गंभीर झाल्यानंतर १६ ऑगस्टच्या पहाटे त्याचा मृत्यू झाला.तर पाच विद्यार्थ्यांवरउपचार सुरू आहेत.मृत राजेश याचा चुलत भाऊ रामप्रसाद हा देखील गंभीर आजारी असून, त्याला उपचारासाठी चूरणी रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. अमरावती शहरात असणाऱ्या महर्षी पब्लिक स्कूलमध्ये हे विद्यार्थी आजारी पडल्यावर त्यांना इतक्या लांब मेळघाटातील दुर्गम भागात पाठवून शाळेनं हात वर केल्यामुळं रोष व्यक्त केला जातोय. विद्यार्थ्यांना त्वरित रुग्णालयात न नेता आपली जबाबदारी झटकणाऱ्या महर्षी शाळा प्रशासनाविरोधात कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत शाळा प्रशासनानं अधिक संवेदनशीलता आणि तत्परता दाखवणे आवश्यक असल्याचे मत पालकांकडून व्यक्त होत आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी आदिवासी निवासी शाळांची नियमित तपासणी करणे अपेक्षित आहे. या घटनेची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी विविध सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.

### शाळा प्रशासना विरोधात रोष

विद्यार्थी आजारी पडल्यानंतर त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्याऐवजी त्यांच्या दुर्गम भागातील गावी पाठवून शाळेने हात वर केल्यामुळे रोष व्यक्त होत आहे. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून आजारी मुलांवर उपचार करण्याऐवजी थेट त्यांना गावी पाठवले जाणे, यात शाळा प्रशासनाचा बेजबाबदारपणा उघड झाला आहे. या प्रकरणात जे कोणी दोषी आहेत, त्यांच्यावर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी केली आहे.(बॉक्स)या विद्यार्थ्यांवर सुरू आहेत उपचार

रविदास बेठेकर (१५), विशाल बेठेकर (१७), राम धांडे (१७), सतीश बेठेकर (२०) आणि रोहन जांभेकर (१५) या पाच विद्यार्थ्यांना अमरावती मधील कुसुमांजली हॉस्पिटल मध्ये उपचार सुरु आहेत .

# आठवडाभरात काढा 'फूड ॲण्ड ड्रग्ज'चा परवाना

## पोषण आहार शिजविणाऱ्या शाळांना एफडीएचे आदेश

### शालेय प्रशासनात धडकी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती–**

विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहार प्रकरणी आता अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. शासनाच्या आदेशानंतरही वर्षानुवर्षे फूड ॲण्ड ड्रग्जचा परवाना न घेता पोषण आहार शिजविणाऱ्या शाळांना आता आठवडाभरात परवाना काढण्याची सक्ती करण्यात आली आहे.अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. शाळेबाहेरील खाद्यपदार्थांवर कारवाई केल्यानंतर आता शाळेच्या आवारातच विद्यार्थ्यांच्या ताटात वाढल्या जाणाऱ्या पोषण आहाराकडे एफडीएने मोर्चा वळविला आहे. पोषण आहार शिजविणाऱ्या शाळांनी खाद्य सुरक्षा नियमांचे पालन केले आहे की नाही, याची तपासणी आता अधिक कडक होणार आहे. नुकत्याच शिक्षण विभागाच्या शालेय पोषण आहार विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत पोषण आहाराच्या वितरणापासून ते गुणवत्ता तपासणीपर्यंतच्या प्रक्रियेबाबत कठोर सूचना देण्यात आल्या. पोषण आहार शिजविणाऱ्या शाळांनी खाद्य सुरक्षा नियमांचे पालन केले आहे की नाही, याची तपासणी आता अधिक कडक होणार आहे. नुकत्याच शिक्षण विभागाच्या शालेय पोषण आहार विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीत पोषण आहाराच्या वितरणापासून ते गुणवत्ता तपासणीपर्यंतच्या प्रक्रियेबाबत कठोर सूचना देण्यात आल्या.




### शाळांच्या स्वयंपाकघरांवरही प्रश्नचिन्ह

पोषण आहार तयार करण्यासाठी शाळांमध्ये असलेल्या स्वयंपाकघरांची स्वच्छता, अन्न साठवणूक, पाण्याची उपलब्धता, स्वयंपाकाची पद्धत आणि अन्नाची सुरक्षितता याकडेही आता लक्ष दिले जाणार आहे. परवाना मिळविताना या बाबींची पूर्तता करावी लागणार असल्याने अनेक शाळांच्या स्वयंपाकघरांची प्रत्यक्ष स्थितीही तपासणीच्या फेऱ्यात येण्याची शक्यता आहे.

२०२० चा आदेश; अंमलबजावणी आता बॉक्स

सन २०२० मध्येच शासनाने पोषण आहार शिजविणाऱ्या शाळांना 'खानावळ' संवर्गात फूड ॲण्ड ड्रग्जचा परवाना घेणे बंधनकारक केले होते. मात्र, प्रत्यक्षात अनेक शाळांनी अद्यापही परवाना घेतलेला नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे इतकी वर्षे शासनाचा आदेश कागदावरच होता का, असा सवाल उपस्थित होत आहे. आता एफडीएने शिक्षण विभागाला आठवडाभराची मुदत दिली. संबंधित शाळांनी तातडीने परवाना काढण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. शिक्षण विभागाकडून सर्व संबंधित मुख्याध्यापकांना याबाबत पत्र पाठविण्यात येणार आहे.

### आधी चव, मगच विद्यार्थ्यांच्या ताटात!

पोषण आहार विद्यार्थ्यांना वाढण्यापूर्वी त्याची गुणवत्ता तपासण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आहाराची चव घेणे आवश्यक करण्यात आले आहे. आहाराची चव, गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षितता तपासल्यानंतरच तो विद्यार्थ्यांना देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट संबंध असलेल्या पोषण आहाराबाबत हलगर्जीपणा झाल्यास त्याचा फटका विद्यार्थ्यांना बसू शकतो. त्यामुळे आहार तयार करणाऱ्या शाळांपासून वितरणापर्यंत संपूर्ण प्रक्रियेवर प्रशासनाचे लक्ष राहणार आहे.

दर्यापूर ते अमरावती मार्गावरील

# आराळा फाटा जवळ भीषण अपघात

### एक ठार दोन गंभीर जख्मी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८दर्यापूर** सोमवारी सायंकाळी नागपंचमीच्या दिवशी दर्यापूर ते अमरावती मार्गावरील आराळा फाटा जवळ भीषण अपघात झाल्याची धक्कादायक घटना सायंकाळी साडेसहा वाजता च्या सुमारास घडली आहे या अपघातात एक ठार झाला असून दोन गंभीर जखमी झालेले आहे .

मिळालेल्या माहितीनुसार जखमी व मृतक हे आदिवासी मजूर असल्याचे समोर आलेले आहे आरळा ते बोराळा रस्ता क्रॉसिंग करताना अमरावती नेणाऱ्या एसटी बसची सदर टू व्हीलर ला धडक लागली व या धडकेत हा भीषण अपघात घडला आहे यात एक घटनास्थळीच मृत्यू झाला आहे सदर अपघाताची माहिती रुग्णसेवक विकी होले व रुग्णसेवक सचिन शेलारे यांना सेनाचाही विलंब न करता अवघ्या पाच मिनिटांमध्ये बारा किलोमीटर अंतर पार करून अपघाता स्थळी पोहोचले व जखमींना तात्काळ दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचाराकरता दाखल करण्यात आले आहे यात डॉक्टरांनी एक मृत्यू घोषित केलेला आहे . सदर आदिवासी मजूर हे दारापूर येथे शेतकामाला आल्याची प्राथमिक माहिती मिळालेली आहे अपघात एवढा भयंकर होता की घटनास्थळी पाहणाऱ्यांची सुद्धा मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती तर रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या रांगत रांग लागलेल्या होत्या अपघाताची माहिती मिळताच खल्लार पोलीस स्टेशन व दर्यापूर पोलीस स्टेशन अपघात तरी दाखल झाले पंचनामा करून पुढील तपास पोलीस करीत आहे उपजिल्हा रुग्णालयात अपघाताची मदत करण्यासाठी अंकुश कावडकर नितेश वानखडे राहुल भुम्बर, शुभम होले , हेमंत उमाळे , आधी सहकारी उपस्थित होते .



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

# सरपंच आरक्षणात मोठा बदल !

## १५ जिल्ह्यांतील ओबीसी आरक्षणाला कात्री

### खुल्या प्रवर्गाचा टक्का वाढला

आरक्षणाची ५० टक्क्यांची कमाल मर्यादा कायम ठेवण्यासाठी राज्य सरकारने १५ जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांच्या आरक्षणामध्ये मोठा बदल केला आहे. विभागाच्या शुद्धीपत्रकानुसार, नागरिकांचा मागास ग्रामविकास प्रवर्ग आणि खुल्या प्रवर्गाच्या आरक्षणात सुधारणा करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणानुसार निश्चित असल्याने त्यात कोणताही बदल झालेला नाही.

ग्रामविकास विभागाने धुळे, जळगाव, हिंगोली, नांदेड, लातूर, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या १५ जिल्ह्यांमधील सरपंच पदांच्या आरक्षणाची पुनर्रचना केली आहे. यामुळे ओबीसी प्रवर्गातील ५१२ पदे कमी झाली असून, ती पदे आता खुल्या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आली आहेत. राज्य निवडणूक आयोगाने २३ जुलै २०२६ रोजी दिलेल्या पत्रानंतर ग्रामविकास विभागाने हा निर्णय घेतला आहे.

# नागपुरातील १२ शाळांसह न्यायालयात बॉम्बस्फोटाची धमकी; भांडेवाडी, अजनी, काटोमधील शाळांना आला मेल!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ नागपूर** शहरातील आघाडीच्या आणि प्रतिष्ठित शिक्षण संस्था असलेल्या १२ शाळांमध्ये मंगळवारी सकाळी १० च्या सुमारास बॉम्ब ठेवण्यात आला असून तो फुटणार अशी धमकी मिळाल्याने पोलीस दलात खळबळ उडाली. शहरातील १२ शाळांच्या अधिकृत ई मेलवर सकाळी हा मेल पाठवण्यात आला होता. सकाळी शाळा उघडल्यानंतर मुख्याध्यापकांनी संगणक उघडताच खळबळ उडाली.




शाळांना बॉम्ब स्फोटाने उडवून देण्याची धमकी देणाऱ्याने या शाळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार शाळेतील मुलांवर लादत असल्याची आगपाखड मेलमध्ये केली आहे. त्यामुळे या शाळा बॉम्बने उडवून देण्याची वेळ आल्याचा उल्लेख धमकीतून करण्यात आला आहे.बॉम्बची धमकी मिळालेल्या शाळांमध्ये सेंटर पॉईंटच्या भांडेवाडी, सदर शाळेसह केंद्रीय विद्यालयाच्या अजनी, काटोल, वायुसेना नगर येथील शाळांचा समावेश आहे.




# तुकाराम मुंढेंच्या कारवाईचा 'बुढ्ढी के बाल' विक्रेत्यांनाही धसका

## थेट रंगच बदलला, स्वतःहूनच करतायत सुधारणा!

**अरुण जोशी**
**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे आले आणि राज्यात खाद्य पदार्थात जणू क्रांतीची लाट आली. साधी पाणीपुरी असो की मोठे नट जाहिरात करीत असलेला गुटका. कोणीच सुटले नाही आणि आताही दंड, विक्री मनाई, परवाना रद्द हे शब्द परवलीचे ठरू लागले आहे. काही तर कारवाई होण्याआधीच स्वच्छ होवू लागले आहे. त्यातलाच हा प्रकार आहे.

असा व्यक्ती विरळाच ज्याने बुढी के बाल म्हणजेच हा पदार्थ चाखला किंवा पाहला नसेल. लहानपणी याचे गुब्बारे घेऊन मिरविण्याचा आनंद काही औरच. पण आता हे खाद्य परिचित अशा गुलाबी किंवा लाल रंगात मिळणार नाही. कारण मुंढे यांच्या खात्याचे लक्ष गेले तर काही खैर नाही, अशी भीती आहे .



अन्न सुरक्षा कायद्यानुसार खाद्य पदार्थात औद्योगिक रंगाचा वापर करणे बेकायदेशीर आहे. या बुढ्ढी के बाल पदार्थात असे दिसले. म्हणजे कृत्रिम घातक रंग आढळले. या पदार्थास म्हणजे कॉटन कँडीस आकर्षक करण्यासाठी कापड उद्योगात वापरल्या जाणाऱ्या ' रोडामाईन – बी ' या रासायनिक रंगाचा वापर होत आहे. हे रसायन मानवी शरीरासाठी अत्यंत अपायकारक समजल्या जाते. त्यामुळे कर्करोग, यकृताचे आजार व अन्य गंभीर व्याधी होण्याची शक्यता बळावते.

या खात्याने आता खाद्य पदार्थात वापरल्या जाणाऱ्या काही घातक व मान्यता नसलेल्या कृत्रिम रंगावर कडक बंदी घातली आहे. त्यावर बोट ठेवून असंख्य पदार्थ बंद झाले. ऋऊ– ने विविध जत्रा, पार्क, फुटपाथ विक्रेते यांच्याकडून अश्या पदार्थांचे नमुने घेत ते प्रयोगशाळेत तपासणीस पाठविले. आणि घातक रंग आढळलेल्या खाद्य पदार्थास मनाई केली. त्यांचे साठे जप्त केले. कॉटन कँडी यावर पांडेचेरी व अन्य राज्यात पूर्वीपासून मनाई आहेच. बुढ्ढी के बाल हा तसा चिरपरिचित पदार्थ. त्यावरील घडामोड लक्ष वेधणार नाही तर नवलच. ' असली बुढ्ढी के बाल अब वापस ' अशी एक टिपणी आहे. म्हणजे आजीबाईचे शुभ्र पांढरे केस आले परत.



सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ अमरावती विदर्भ महाराष्ट्र देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वाढला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :